# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. ३४७/२०२३ | दिनांक ०९/१०/२०२३

**मुंबई-अहमदाबाद हायवेवरती झालेल्या अपघाताचा मनात राग धरुन गॅस टॅकरचे नुकसान करुन गॅस टॅकरचा चालक यास मारहाण केल्याने त्यांच्या जिव जाण्यास कारणीभुत ठरणा-या ०४ आरोपीत यांना अवघ्या ०४ तासात अटक करण्यास नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.**

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दि. ०१/१०/२०२३ रोजी सकाळी ६:११ ते ०६:३६ वाजेच्या दरम्यान, एस.पी.ढाबा फॅमिली रेस्टॉरंट बार अॅन्ड लॉजिंगचे समोरील सर्विस रोडवर,गुजरात वाहिनीवर, मुंबई-अहमदाबाद हायवेच्या मालजीपाडा जवळील ब्रिजच्या खाली फिर्यादी यांचे चुलत काका यांचे ताब्यातील गॅस टँकरचा मारुती कंपनीच्या कार क्रमांक MH48 CK 3739 हिस टच झाल्यावरुन, सदर मारुती कार मधील अनोळखी ४ लोकांनी, मारहाणीमुळे फिर्यादी चुलत काका रामकिशोर यांचा जिव जाऊ शकतो याची जाणीव असतांना देखिल, माझे चुलत काकाशी वाद घालुन त्यांना शिवीगाळ करुन, दगडाने गॅस टँकरचे काचेचे नुकसान करुन फिर्यादी योंच चुलत काका यांना ठोश्याबुक्यांनी मारहाण केली व या मारहाणीमुळे फिर्यादी यांचे चुलत काका रामकिशोर यांचा मृत्यू झाल्याने सदर फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन सदर चार अनोळखी इसमाविरुध्द नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ३१७/२०२३ भादविस कलम ३०४,४२७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयात संशयीत इसम नामे १. सबॅस्टीअन कृष्णा वालतुपरमबिल, वय ५३ वर्षे, रा. बी-३०४, प्लॉट क्र. ०७, चंद्रेश हेरीटेज, आचोळे क्रॉस रोड, संयुक्त नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर,२. उत्सव ब्रिजकिशोर शर्मा, वय २५ वर्ष, रा. फ्लॅट नं. ५०५, ए विंग, भुमी ॲको पोलीस, ग्लोबल सिटी जवळ, विरार प., ता. वसई, जि. पालघर,३. विकी अशोक बारोट, वय २३ वर्ष, रा. फ्लॅट क्र. ए/००२, हरीधाम अपार्टमेंट, निळेमोरे, नालासोपारा प., ता. वसई, जि. पालघर व ४. विवेक महेंद्र पवार, वय ३० वर्षे, रा. बी/०१, समयक, अपार्टमेंट, गणपती मुदीराजवळ, नालासोपारा प., ता. वसई, जि. पालघर यांना नालासोपारा पुर्व या भागातुन ताब्यात घेवुन सदर इसमाकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयामध्ये अटक करण्यात आली आहे. सदर मयत यांचे शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर गुन्हयामध्ये भादविस कलम ३०२ यांची वाढ करण्यात आली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर टिळेकर हे करीत आहेत.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, स.पो.नि.गणेश केकान, रोशन देवरे, मनिषा पाटील, पो.हवा.देविदास पाटील, शेखर पवार पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.